Forwarded

प्रेस नोट:-

प्रति,

सर्व संपादक

विषय: जळगाव जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक; उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये - पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे आवाहन.

जळगाव:

जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदासाठीच्या भरती प्रक्रियेला आज दिनांक ११/०२/२०२६ रोजीपासून पोलीस मुख्यालय, जळगाव येथे अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक वातावरणात सुरुवात झाली आहे.
आज भरती प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी एकूण ५०० उमेदवारांना शारीरिक मोजमाप आणि मैदानी चाचणीसाठी बोलावण्यात आले होते. यापैकी ३४० उमेदवार प्रत्यक्ष हजर राहिले असून, ४१ उमेदवार शारीरिक मोजमापात अपात्र, तसेच १७९ उमेदवार मैदानी चाचणीत अपात्र ठरलेले आहेत. विहित निकषांनुसार शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीअंती १२० उमेदवार मैदानी चाचणीत पात्र ठरले आहेत.
सदरची संपूर्ण भरती प्रक्रिया ही पूर्णपणे गुणवत्तेवर (Merit) आधारित असून, यात मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी व पारदर्शकतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. भरती प्रक्रियेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संपूर्ण मैदानावर सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांची नजर असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली सर्व चाचण्या पार पडत आहेत.
याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी सर्व उमेदवार आणि त्यांच्या पालकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे की, काही समाजकंटक किंवा दलाल "मी तुमची पोलीस भरतीत निवड करून देतो" असे खोटे सांगून पैशांची मागणी करण्याची किंवा इतर कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारांनी अशा कोणत्याही भुलथापांना किंवा आमिषाला बळी पडू नये. पोलीस भरतीसाठी कोणालाही पैसे देणे किंवा घेणे हा कायदेशीर गुन्हा आहे.
जर कोणत्याही व्यक्तीने भरती करून देण्याच्या बहाण्याने पैशांची मागणी केली किंवा आपली फसवणूक करण्याचा प्रयत्न केला, तर उमेदवारांनी घाबरून न जाता तात्काळ पोलीस अधीक्षक कार्यालय किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (ACB) तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्यात येईल.
ही भरती प्रक्रिया केवळ आणि केवळ कष्टाच्या आणि गुणवत्तेच्या जोरावरच पार पडणार असल्याने, उमेदवारांनी अफवांवर विश्वास न ठेवता आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे आवाहन जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(जनसंपर्क अधिकारी)

जळगाव जिल्हा पोलीस दल.

7:13 pm